# झेप

मागे वळून पाहताना अनेक आठवणी दाटून येतात. अनेक प्रसंग डोळ्यासमोर उभे राहतात आणि मग काय लिहू आणि काय नको असे होऊन जाते. त्यानंतर प्रसंगांची जुळणी सुरु होते. शून्याप्रत गेलेल्या मला आईवडील अथक प्रयत्नाने उभी करतात, बाहेर काढतात. त्यामुळे या सुंदर जगाचा मी जमेल तेवढा आनंद घेऊ शकते म्हणून त्यांना प्रथम वंदन.

माझा जन्म झाला तेव्हा दादा कामासाठी अमरावतीला गेले होते. आल्यावर दुसऱ्या दिवशी पहायला आलेल्या माझ्या वडिलांनी पुढे आयुष्यभर माझ्यावर प्रेमाची पाखरण केली. मला कसलेही बंधन न घालता जे मला जमेल ते करु दिले, हिंमत दिली, साथ दिली, 'ते' माझी प्रेरणा होते.

माझी पहिली दोन वर्षे (जेव्हा आपल्याला फारसे कळत, आठवत नसते) आनंदात, कौतुकात गेली आणि अचानक एक दिवस माझ्या आयुष्याला एकदम कलाटणी मिळाली. माझी हालचाल मंदावली. हळुहळू चालण्याचा आनंद घेऊ लागलेली मी निपचित पडून राहू लागले. माझ्या डाव्या पायातली शक्ती कमी झाली.

इथून माझ्या आईची परीक्षा सुरु झाली. पण ती माऊली हरली नाही. जिद्दीने तिने माझी शुश्रुषा केली. मला त्या दुष्ट आजारातून खूप मेहनतीने बाहेर काढले आणि एक मुलगी म्हणून जे काही आईने घडवायचे असते, तसे अतिशय कठोर होऊन घडविले. ती कठोर झाली नसती, मला लाडाने गोंजारत बसली असती, तर आज मी जशी उभी आहे, तशी अजिबात राहू शकले नसते.

आईच्या २१-२२ व्या वर्षी माझा जन्म झाला. म्हणजे ती काही फार अनुभवी नव्हती आणि मुलीच्या अशा आजाराला तिला सामोरे जावे लागले, पण तिने हिंमत न सोडता मला सक्षम बनविले. धन्य ती माऊली .... आई थोर तुझे उपकार.... तुला शतशः प्रणाम !!

माझ्या डाव्या पायाचं आपरेशन मी सव्वा दोन वर्षांची असताना झालं. त्यामुळे फारसं काही आठवणीत नाही. परंतु आईवडिलांची खूप परीक्षा होती एवढं नक्की.

माझे शालेय जीवन सामान्य गेलं. जेव्हा सर्व शाळेचा एकत्र पी.टी.चा तास व्हायचा तेव्हा मी ट्रँगल आणि बासरी वाजवत होते. ८वी पासून मी संगीत विषय घेतला होता. त्यामुळे संगीत घेतलेल्यांची वेगळी तुकडी करण्यात आली. ९वीत असताना वार्षिक परीक्षेत मी प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले आणि इंग्रजी विषयात वर्गात विशेष प्राविण्य मिळविले होते.

१० वी नंतर माझ्या पायाचे पुन्हा एक ऑपरेशन झाले. त्यातून बाहेर पडायला वेळ लागल्याने माझे ते शैक्षणिक वर्ष वाया गेले. मी कॉलेजला जाऊ शकले नाही. ते ४-६ महिने स्मरणात आहेत. संपूर्णपणे गादीवर पडून होते. त्या कालावधीत आई दादांनी घेतलेले कष्ट आठवतात. खूप वाईट वाटतं, त्या दोघांनी खूप सोसलं आणि सर्वात अविस्मरणीय म्हणजे या कष्ट सोसण्याचा त्यांनी कधीही उच्चार केल्याचं मी एकदाही ऐकलं नाही. आपल्या आपत्यावर आईवडिलांचं केवढं प्रचंड प्रेम असतं, याचं हे मूर्तीमंत उदाहरण आहे. आरोग्यपूर्ण हसरं मूल सर्वांना प्रिय असतं, पण रडकं, व्याधीग्रस्त मूल फक्त त्या मातापित्यांचं असतं. असं वाटतं, देवा अशी वेळ कुण्णा कुणावर आणू नकोस. सर्वांना सुखी आनंदी ठेव. पण....

दुसऱ्या ऑपरेशननंतर पुन्हा चालण्याचा सराव करताना घामाघूम होत होते. परंतु आई दादांच्या सहाय्याने मी पुन्हा उभी राहिले. देवकृपेची अनुभूती घेतली. मी कॉमर्स कॉलेजला ॲडमिशन घेतली तेव्हा माझे वडील मला कॉलेजमध्ये सोडायला येत असत आणि येताना आता जी माझी मोठी वहिनी झाली (मोठ्या भावाची बायको) तिच्याबरोबर येत असे. कॉलेजला जाताना होणारे कष्ट पाहून दादांना खूप वाईट वाटायचं, ते म्हणायचे 'झेपेल तेवढंच कर, मी तुला आयुष्यभर सांभाळीन, काळजी करु नकोस', पण आईची माया, ध्येय वेगळं होतं. तिला मला स्वावलंबी करायचं होतं. ती या कुठल्याही त्रासाचं कौतुक करत नव्हती. एकाच ध्येयाने ती

मला घडवत होतो. रडत खडत मोही साथ देत होते. त्याचं महत्व तेव्हा समजत नव्हतं. आता लक्षात येत आहे.

कॉलेजमध्ये असताना एका ॲक्सिडेंटला सामोरे जावे लागले. एक छोटं ऑपरेशन, फ्रॅक्चरमुळे पायाला प्लास्टर असे सर्व सोपस्कार करण्यात दोन पेपर देता आले नाहीत, म्हणून पुढच्या सेमिस्टरला आठ पेपर देऊन अखेरीस बी.कॉम. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.

जसे आईने घरकाम शिकविले, तसेच तिला वाटत होते मी आर्थिकदृष्टया पण स्वावलंबी असले पाहिजे, त्यामुळे मी जॉब करायलाच पाहिजे असा तिने आग्रह धरला.

मला बँक काय असते याची काहीही कल्पना नव्हती, तरीही मी सर्वांना सांगायची, मी बँकेत नोकरी करणार. देवाची कृपा, मी बँकेची पहिलीच परीक्षा पास झाले आणि मला बँकेत जॉब मिळाला. मी बँकेत २१ वर्षे जॉब केला व पेन्शला पात्र झाले आणि मुलाच्या आग्रहामुळे व्ही.आर.एस. घेतली. पण आज पेन्शन मिळते त्यामागे आईचा आग्रह कधीही विसरता येणार नाही.

बँकेत नोकरी करुनही कर्ज घेऊन चैन करावी असे मला कधीही वाटले नाही, कर्ज घेतल्यास बँक एकरकमी पैसा देते पण व्याजरुपात आपल्याला खूप पैसे भरावे लागतात त्यामुळे मला तसे करणे कधीच आवडले नाही. सामाजिक कार्यात सहभाग घेणे शक्य नसले तरी मिळणाऱ्या पेन्शनमधून मी गरजू विद्यार्थी, पूरग्रस्त, कोव्हिडच्या संकटात गरजूंना धान्य वाटप, सियाचीन सारख़्या ठिकाणी काम करणाऱ्या आपल्या बांधवांसाठी उभारलेल्या ऑक्सिजन प्लँटमध्ये आर्थिक सहाय्यात सहभाग घेतला. हे पुरेसे नसले तरी खारीच्या वाटयाइतके समाधान आहे. खरे म्हणजे परमार्थात हयाचा उच्चार वर्ज आहे.... म्हणजेच अजून मन मोठं व्हायचं आहे, ते होवो... तरच प्रगती संभवते.

सर्वसामान्य मुलींपेक्षा माझे लग्न उशीरा झाले. माझ्या मनासारखे होईपर्यंत आईवडिलांनी माझ्यावर जबरदस्ती केली नाही. शाळा, कॉलेज, नोकरी यानंतर

लग्न झाल. एकत्र कुटुंब, येणार जाणार भरपूर. जुन्या चालीरितींना प्राधान्य अशा घरात नोवहेंबर १९९२ ला मी प्रवेश केला. माझा नवरा इंजिनिअर (प्राध्यापक) आहे. सुस्वभावी, शांत, समजुतदार अशा अनेक चांगल्या गुणांचा धनी आहे. त्याची आणि मुलगा सुनेची मला खूप चांगली साथ आहे, म्हणून माझे जीवन सुसह्य आहे.

सासऱ्यांच्या आग्रहाने केलेल्या गुरुंचे अविस्मरणीय पाठबळ आहे. माझ्या स्वभावात झालेल्या बदलातून गुरुकृपेची अनुभूती मला येत असते. ती शब्दांकित करुन व्यक्त करणं तसं आवघड आहे, पण अनुभवाचा आनंद मात्र अतीव आहे, हे निश्चित. गुरु केल्यावर विचारांना स्थिरता येऊन योग्य दिशा मिळत आहे असं जाणवते.

गुरुकृपा आणि कौटुंबिक स्वास्थ्य ह्यामुळे राहून गेलेल्या विषयांचा आनंद घेण्याचा मी प्रयत्न करत आहे. उदा. ड्रॉईंग, पेंटिंग, थोडाफार गाण्याचा प्रयत्न करत आहे. खूप मजा येत आहे ह्या शंकाच नाही.

अजून एक आनंद घेण्याचा प्रयत्न चालू आहे. सध्या मी कार ड्रायव्हिंग शिकत आहे. माझ्या या प्रयत्नात नवऱ्याचा खूप मोठा सहभाग आहे. दिवसभर नोकरीत दमून आल्यावर देखील तो नेटाने ड्रायव्हिंगचे ट्रेनिंग द्यायला येतो, त्याच्या चिकाटीला सलाम ! ड्रायव्हिंग लवकर यावं अशी प्रार्थना आहे. हे शिकण्याचा उद्धेश मुलींसाठी, सिनिअर सिटिझन्ससाठी काही करता आल्यास करावं अशी इच्छा धरुन आहे.

हल्ली कुणाला एकमेकांकडे जायला वेळ नसतो. म्हणून राखी पौर्णिमा, भाऊबीज यासारख्या सणांना आम्ही बहिणी एकीच्या घरी जमून हे सण साजरे करतो. त्या निमित्ताने सर्वजण एकत्र जमून सर्वांच्या गाठीभेटी होतात. सर्वजण जमल्यावर एक छोटासा गेम खेळतो, त्यामुळे वातावरण मोकळं होऊन सर्वजण मिळून मिसळून बोलायला लागतात ह्यात सहाजिकच मी पुढाकार घेते.

मोबाईलमुळे फोटो काढणे सहज शक्य झाले आहे. तोही कार्यक्रम उत्साहात करतो. नंतर हे फोटो पहाताना खूप मजा येते.

खाण्यापिण्याच्या कार्यक्रमाला कधी एक एक पदार्थ करुन आणतो, कधी ऑर्डर देऊन मागवतो. आपल्या एकत्र येण्याने पुढची पिढीही एकत्र येते. आपले पाहून शिकते, म्हणून मला हा आटापिटा करावा असे वाटते. ह्यातही आईवडिलांनी दिलेल्या शिकवणुकीचा वारसा पुढे चालावा म्हणून एक प्रयत्न असतो हे विसरता येणार नाही. माणसाला कौतुकाच्या थापेने उत्साह येतो, प्रेरणा मिळते. त्यावरच माझे मार्गक्रमण चालू आहे. आपल्यातले गुण ओळखून त्यांची वाढ करता आली, तर जगणं एक सुंदर अनुभूती वाटू लागते. कंटाळा येत नाही. आपण का जगत आहोत असले क्षुद्र प्रश्न पडत नाहीत, तर आपल्याला दिवसाचे २४ तास अपुरे पडू लागतात.

कॉलेजमध्ये असताना मी चेस, कॅरम, टेबल टेनिस ह्या स्पर्धांमध्ये भाग घेऊन त्यात विनर रनर पण आले. आता फक्त कॅरम खेळते.

बकेट लिस्टमध्ये बॅडमिंटन, वॉकिंग, पर्यटन अशा अनेक गोष्टी आहेत. पण खंत करुन कसे चालेल ? देवाने जे दिलयं ते तरी मी कुठे पूर्णपणे वापरलं ? मग त्याला दोष कसा देऊ ?

मोठया भावाच्या आग्रहाने मी मॉडिफाईड स्कूटर शिकले. त्याचा मला खूप खूप फायदा झाला व आजही होत आहे. माझी स्कूटर पाहून अनेकांनी तशी स्कूटर बनविली. त्यांनाही खूप फायदा झाला, ह्याचं श्रेय माझ्या भावाला जाते.

माझा धाकटा भाऊ मला गाण्यासाठी नेहमी प्रीत करतो. त्या दृष्टीने सराव करण्याचा माझा मानस आहे. गुरुकृपेने ते घडेल ही नक्की श्रध्दा आहे !

मला जमेल ते करण्यासाठी माझा नवरा व मुलाची शंभर टक्के साथ असते, त्यामुळे फॅमिली गेट टुगेदर, सोसायटीचा गणेश उत्सव, भिशी अथवा माझे ड्रॉईंग, पेंटिंग, शॉपिंग मी त्यांच्या मदतीने उत्साहात करत असते.

हे सर्व करत असताना जीवनातील प्रत्येक गोष्टींकडे सकारात्मकतेने बघण्याचा संस्कार माझ्या वडिलांनी माझ्यावर केला त्यामुळेच मी आज या माझ्या खडतर जीवन प्रवासात यश प्राप्त करु शकले अशी माझी ठाम धारणा आहे.

लग्नानंतर एकत्र कुटुंबात असल्याने आईच्या मेहनतीला फळ मिळाले. घरकाम, संस्कार या सर्व अग्नीदिव्यातून मी उत्तमरितीने मार्गक्रमण केले. अर्थात याचे श्रेय फक्त आणि फक्त आईचे आहे. वागायला चुकले असते तर उध्दार आईवडिलांचा नक्की केला जातो, पण चांगलयाचं कौतुक मात्र त्या वागणाऱ्या व्यक्तीचं होतं.... जगरहाटी आहे.... अजून काय म्हणणार ?

१८ सप्टेंबर १९९३ ला मी एका सुंदर, सुदृढ मुलाला जन्म दिला. आम्हा आईवडिलांचा आनंद गगनात मावत नव्हता. त्याच्या जन्माच्या दिवशी आम्ही दोघं जगातले सर्वात आनंदी दांपत्य होतो अशी आमची भावना होती.

मुलाला घडवताना खूप मजा येत होती. तो खूप हुशार आहे. शालेय जीवनात त्याने कथाकथन, रनिंग, डान्स यात बक्षिसे मिळविली. जिम्नॅस्टिकमध्ये पहिल्या वर्षी त्याला गोल्ड मेडल मिळालं. श्रीमत् भगवद्गीता, अथर्वशीर्ष पाठांतरातही त्याने प्रथम पारितोषिक मिळविले. आज तो कॉम्प्युटर इंजिनिअर होऊन अमेरिकेत जॉब करत आहे. तरीही मनाने तो आईवडिलांच्या विचारात असतो, काळजी घेतो, कळकळीने सल्लाही देतो.

सर्वात आनंद आणि अभिमानाची गोष्ट म्हणजे मे २०१८ ला मुलाच्या पदवीदान समारंभाला आम्ही दोघेही अमेरिकेला जाऊन आलो. खूप छान वाटले. त्यानेही आम्हाला १५ दिवस जमेल तेवढे फिरवले, अमेरिका दर्शन घडविले.

६ डिसेंबर २०१९ ला तो विवाहबध्द झाला. माझी सूनही त्याच्याबरोबर एम्.एस्. झालेली आहे. तीही सुस्वभावी, काळजी घेणारी आहे.

देवाने मला पुष्कळ दिले आहे, तेव्हा आता मला निरपेक्ष वृत्तीने वागण्याची सद्बुध्दी होऊ दे हीच प्रार्थना !

***... सौ. अंजली राजेंद्र जोशी***